करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
वर्ष 34 वे
# संदेश
www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०




रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.४२ | पाने-२० | दि.१/११/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.





# करमाळा विधानसभा - ३१ उमेदवारांची अंतिम यादी जाहीर - ४ अर्ज छाननीत बाद

करमाळा : करमाळा विधानसभा मतदार संघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत म्हणजे २९ ऑक्टोबर पर्यंत ३५ जणांचे ४४ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. ३० ऑक्टोबरला उमेदवारी अर्जाची छाननी करण्यात आली. त्यावेळी चार जणांचे अर्ज बाद झाले आहेत. त्यामुळे ३१ उमेदवारांची अंतिम यादी निवडणूक निर्णय अधिकारी अंजली मरोड व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पा ठोकडे यांनी जाहीर केली आहे.

३५ उमेदवारा पैकी २ अपक्ष तर १ रिपाइं व १ बसपा असे चार अर्ज, अर्जातील त्रुटीमुळे छाननीत बाद झाले आहेत. यामध्ये अपक्ष उमेदवार कल्याणराव खाटमोडे, प्रतापराव जगताप यांचेसह रिपाइंचे गणेश घुगे व बसपाचे



ॲड.महादेव कदम यांचे अर्ज बाद झाले आहेत. त्यामुळे आता ३१ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. येत्या ४ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारी अर्ज परत घेण्याची अंतिम मुदत आहे. त्यानंतर या निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

**अंतिम यादीत राहिलेले उमेदवार पुढीलप्रमाणे..**

संजयमामा विठ्ठलराव शिंदे (निमगाव - अपक्ष), संजय वामन शिंदे (दहिगाव - बसपा), अभिमन्यु किसन अवचर (मांगी, अपक्ष), संजय लिंबराज शिंदे (खांबेवाडी, अपक्ष), दत्तात्रय पांडूरंग शिंदे (उमरड, अपक्ष), नारायण गोविंदराव पाटील (जेऊर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट),माया रामदास झोळ (वाशिंबे, अपक्ष), विकास शिवाजी अलदार (चोभेपिंपरी, अपक्ष), दिग्विजय बागल (करमाळा, शिवसेना), सागर राजाराम लोकरे (पिंपळखुंटे, मनसे),सिध्दांत सदाशिव वाघमारे (भिमनगर करमाळा, अपक्ष),निवृत्ती पोपट पाटील (बारलोणी, अपक्ष), संभाजी अर्जुन भोसले (जिंती, अपक्ष), उदयसिंग निळकंठराव देशमुख (वांगी नं.१, अपक्ष), जितेंद्र युवराज गायकवाड (कुर्डूवाडी, अपक्ष), संजय विठ्ठल शिंदे (चिंचगाव, अपक्ष), संभाजी भानुदास उबाळे **(पान नं. २ वर)**



राजकारणात बदलत्या परिस्थितीनुसार याग्य निर्णय घेतलेतर यश मिळते.

## संपादकीय..............................................!

# चौरंगी लढत..!

सन २०१९ च्या विधानसभा निवडणूकीची स्थिती व सन २०२४ ची स्थिती यात खुपच बदल झालेला आहे. सन २०१९ च्या विधानसभेपुर्वी झालेल्या लोकसभेत मोदी लाट उसळली होती. महाराष्ट्रात लोकसभेच्या ४८ जागापैकी ४१ जागा महायुतीने जिंकल्या होत्या. त्यामध्ये भाजपाने २५ जागा लढवल्या होत्या त्यामध्ये २३ उमेदवार विजयी झाले तर शिवसेनेने २३ जागा लढवल्या होत्या त्यामध्ये १८ उमेदवार विजयी झाले होते.शिवाय अपक्ष नवनीत राणा विजयी झाल्या, त्या सुध्दा भाजपाकडे गेल्या होत्या. विरोधकांचे पटागंण झाले होते. राष्ट्रवादी काँग्रेसने चार जागा, काँग्रेसने एक जागा तर एमआयएमने एक जागा जिंकली होती. त्यामुळे विधानसभा निवडणुकीतही मोदी लाट कायम होती. त्यावेळी विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून उमेदवारी घेण्यासाठी उमेदवारच इच्छुक नव्हते. यावेळच्या निवडणुकीची पार्श्वभुमी वेगळी आहे. यावेळी देशात मोदीचे सरकार आले असलेतरी महाराष्ट्रात भाजपाचा वारू महाविकास आघाडीने रोखला आहे. यावेळी महाराष्ट्रात ४८ पैकी महायुतीला सत्ता असूनही फक्त १७ जागा जिंकता आल्या. त्यामध्ये भाजपाला-९, शिवसेना (शिंदे गट)-७ व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)-१ यांचा समावेश आहे. याउलट महाविकास आघाडीने अपक्षासह ३१ जागा मिळावल्या आहेत. त्यामध्ये काँग्रेस-१३ व अपक्ष-१, शिवसेना (ठाकरे गट)-९ व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार )-८ जागा मिळवल्या आहेत.त्यामुळे यावेळी महायुतीपेक्षा महाविकास आघाडीकडे विशेषत: शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडे अनेकांचा ओढा आहे.

सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत करमाळा मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेसला उमेदवार मिळता मिळेना अशी स्थिती झाली होती. रश्मी बागल या राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य उमेदवार होत्या पण महायुतीचे वारे पाहून त्यांनी राष्ट्रवादीला रामराम करत शिवसेनेत प्रवेश करून ऐनवेळी तिकीटही मिळवले होते. त्यानंतर राष्ट्रवादीने त्यांचे तिकीट नारायण आबा पाटील यांना देवू केले पण त्यांनी ते शिवसेनेचे तिकीट मिळणार या अपेक्षेवर नाकारले होते. संजयमामा शिंदे यांनी या पक्षाकडून लोकसभा निवडणूक लढवूनही विधासभेला तिकीट नाकारले. अखेर संजय पाटील-घाटणेकर यांना ते तिकीट दिले पण त्यांनीही पुढे पक्षाच्या सांगण्यावरून संजयमामा यांना पाठींबा दिला होता. याउलट स्थिती यावेळी महायुतीची झाली आहे. महायुतीमध्ये ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांना मिळाली. अगितपवार समर्थक विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांनी ही उमेदवारी नाकारली. अन्य तुल्यबळ उमेदवार कोणी नसल्याने राष्ट्रवादीने जागा सोडली. त्यानंतर महायुतीतून ही जागा कोणी लढवायची ? हा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. अखेर उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसाच्या पुर्व संध्येला महायुतीची जागा शिवसेना (शिंदे गट) यांच्याकडे गेली. त्यानंतर भाजपाचे उमेदवार दिग्विजय बागल यांना सेनेत प्रवेश देवून शिवसेनेचे तिकीट श्री.बागल यांना दिले. काळ बदलला की स्थित्यंतर कसे होते याचे हे नामी उदाहरण आहे. मागीलवेळी शिवसेनेच्या उमेदवारीसाठी कोट्यावधी रूपयाचे डील झाली असे बोलले जाते पण यावेळी दुसऱ्या पक्षातील व्यक्तीला ऐनवेळी प्रवेश देवून जागा पक्षाचे नाव राखण्याचा प्रयत्न झाला आहे.

यावेळी मराठा आरक्षण हा एक परावलीचा मुद्दा आहे. राज्यात विशेषत: मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रात तो फॅक्टर चालणार आहे. त्यानुसार सध्याच्या स्थितीला (३ नोंव्हेबार ला अंतिम निर्णय होणार आहे.) दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ हे उमेदवार आहेत. या निवडणुकीतील हाच एकमेव महत्वाचा बदल आहे. अन्यथा मागील निवडणुकीचे चित्र पुन्हा नव्याने साकारल्याचे दिसते. फरक रश्मी बागल ऐवजी दिग्विजय बागल व अपक्ष नारायण आबा पाटील ऐवजी महाविकास आघाडीकडून पाटील उभे आहेत. संजयमामा शिंदे हे पुन्हा अपक्ष आहेतच. मागील निवडणुकीला शेवटपर्यंत आठ उमेदवार रिंगणात राहिले होते. त्यामध्ये चौथ्था क्रमांकाची ४४६८मते, अतुल खुपसे-पाटील यांनी घेतली होती. ते यावेळीही उभे आहेत. ते वगळता आठ पैकी अन्य चार जणांनी म्हणजे अॅड. विजय भिमराव आव्हाड, राम तुकाराम वाघमारे , संजय घाटणे-पाटील,शेख जैनुद्दीन दस्तगीर यांनी यावेळी साधे उमेदवारी अर्जही दाखल केले नाहीत. यावेळी ३१ उमेदवारी अर्ज दाखल आहेत. त्यामध्ये संजय शिंदे नावाचे चार अर्ज आहेत. महाविकास आघाडीकडून पाटील, महायुतीकडून बागल, अपक्ष प्रा.रामदास झोळ याशिवाय अभिमन्यू अवचर, (मांगी), दत्तात्रय शिंदे (उमरड), माया झोळ, विकास अलदर (चोभेपिंप्री), सागर लोकरे (पिंपळखुंटे) मनसे, सिध्दांत वाघमारे(करमाळा), निवृत्ती पाटील (बारलोणी),संभाजी भोसले (जिंती),उदयसिंह देशमुख (वांगी नं.१),जितेंद्र गायकवाड(कुर्डूवाडी),संभाजी उबाळे (म्हैसगाव),धिरज कोळेकर (कुर्डूवाडी),यशवंत शिंदे (आमदार पुत्र) , शहाजान शेख(कुर्डूवाडी),मधुकर मिसाळ (बाळेवाडी) बहुजन मुक्ती पार्टी,गणेश भानवसे (वांगी नं.२),विनोद सितापुरे(दाळवाले) करमाळा,जालींद कांबळे (पोफळज),अॅड. मोहम्मद शेख (जिंती), सुहास ओहोळ (करमाळा),बाळासाहेब वळेकर (निंभोरे),डॉ. सुजित शिंदे (करमाळा),अशोक वाघमोडे ( निलज) न्यू राष्ट्रीय समाज पार्टी असे अर्ज आहेत. त्यातील माया झोळ, यशवंत शिंदे हे डमी अर्ज निघतील पण अन्य किती उमेदवारी अर्ज निघतील हे ४ नोंव्हेबरला समजणार आहे. यावेळी उमेदवारी अर्ज मागच्यापेक्षा जास्त रहाणार यात शंका नाही.

या निवडणुकीत पुन्हा २०१४ चा पॅटर्न विद्यमान आमदार शिंदे यांच्या विरोधात राबवल्याचे दिसते. सन २०१४ च्या निवडणूकीत संजय शिंदे या नामसाधर्म्यामुळे श्री.शिंदे पराभूत झाले आहेत. त्यावेळी संजयमामा शिंदे यांच्या बरोबरच संजय महादेव शिंदे (मते-२०००), संजय नामदेव शिंदे (मते-५५२) व संजय लिंबराज शिंदे(मते-२६२) असे अन्य तीन उमेदवार उभे होते. त्यांना एकूण २८१४ मते मिळाली होती. तर विजयी उमेदवार नारायणआबा पाटील यांना ६०६७४ मते व संजयमामा शिंदे यांना ५८३७७मते पडली होती. आबांची बरोबरी करण्यासाठी मामांना २२९७ मतांची गरज होती तर अन्य शिंदे यांनी २८१४ मते मिळवली होती. ही आकडेवारी पाहता नामसाधार्म्यामुळे संजयमामा यांना पराभवाचा सामना करावा लागला होता. मागील निवडणुकीत हा प्रयोग राबवला नव्हता; यावेळी मात्र विरोधकांनी जाणिवपुर्वक तिघा संजय शिंदेचे अर्ज दाखल केले आहेत. हे अर्ज निघणार की राहणार हे ४ नोंव्हेबरला समजेल.

असे असलेतरी या निवडणुकीत चौरंगी लढत होणार हे नक्की. जरांगे-पाटील यांनी उमेदवार दिलातर प्रा.झोळ किंवा उदयसिंह देशमुख या दोघापैकी एकाला उमेदवारी मिळेल. लढत चौरंगी झालीतरी यावेळी अतुल खुपसे-पाटील पुन्हा निकराने लढत आहेत. गेल्या पाच वर्षात त्यांनी सतत आंदोलने केली आहेत. गावागावात विविध कामे करत कार्यकर्ते जोडण्याचे काम केले आहे. त्यामुळे ते गेल्या निवडणुकीपेक्षा जास्त मतदान घेणार हे नक्की. श्री.खुपसे-पाटील यांना मिळणारी मते ही निर्णायक ठरणार आहेत. नेमके उमेदवार कोण व किती हे ४ नोंव्हेबरला समजणार आहे. त्यानंतर लढतीचे चित्र वाचा पुढील अंकी...

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)


दिवाळी धमाका ऑफर
दिवाळीनिमित्त...
आपल्या कुटूंबातील प्रत्येक व्यक्तीसाठी
उत्तम अशी व्हरायटी उपलब्ध !
प्रत्यक्ष भेट देऊन खात्री करा..!
शुभ दिपावली
प्रत्येक खरेदीवर मिळवा
10% सुट
सयाजी कलेक्शन
कमलादेवी रोड, करमाळा. (मो.9404692182)


आमच्या असंख्य ग्राहकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा
श्री बनशंकरी मोबाईल शॉपी
दिवाळी मोबाईल फेस्टिव्हल
रुपयांपर्यत हमखास डिस्काउंट व
३५०००/- जिंका असंख्य बक्षिसे..
कुपन स्कच करुन बक्षिस लगेच मिळेल.
पहिले बक्षीस
इलेक्ट्रॉनिक गाडी
BAJAJ FINSERV
TVS CREDIT
EMPOWERING INDIA. ONE INDIAN AT A TIME.
-: विशेष सुविधा :-
१) क्रेडीट कार्ड वर १0% पर्यत सुट २) दोन वर्ष वॉरंटी ३) जुना मोबाईल द्या नवीन मोबाईल घ्या
४) सिबिल खराब असल्यास सुध्दा फॉईल केली जाईल ५) पूर्ण भारतात फायनान्सची सोय
राशीन पेठ करमाळा मो.९८९००१४२२३,९६२३२५२५८५,८२९०८२९०८८


नवीन
शाखा सुरू !
॥ सोऽहम् ॥
अलंकार ज्वेलर्स
वाशिंबेकर
राजेंद्र तुकाराम
(राजु काका)
आकर्षक, कलात्मक व खात्रीशीर सोने-चांदीच्या दागिन्यांचे व्यापारी
प्रोप्रा. श्री. राजेंद्र तुकाराम वाशिंबेकर
मो. 9545988559 /9623717123
दत्त पेठ, दुधे बिल्डींग करमाळा, जि.सोलापूर.
आर.पी. ग्रिफशन्स, को. ९०२८७८४५३०५

# डॉ.तानाजी (भाऊ) जाधव

## लोकांच्या मदतीला धावून जाणारा एक देवदूत !



२ नोव्हेंबर या दिवशी भारतात सर्वात मोठा वाढदिवस साजरा होत असतो. तो म्हणजे एका समाजसेवकाचा, एका देवदूताचा. या दिवशी करमाळा या छोट्याशा गावात सुमारे दोन लाख समाजसेवेने झपाटलेले उत्साही तरूण हजारो वाहनांच्या शिस्तबध्द ताफ्याने, आपल्या लाडक्या टायगरला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी येथे उपस्थित होतात. तानाजी भाऊ तु आगे बढो, हम तुम्हारे साथ है । एकच ग्रुप टायगर ग्रुप..!! या घोषणांनी परिसर दणाणून जातो. या आधुनिक युगात तरूणांच्या हृदयावर अधिराज्य गाजविणारे व्यक्तीमत्व, कोट्यावधी तरूणांच्या गळ्यातील ताईत बनलेल्या या देवमाणसाचे टॅटू हजारो युवकांनी आपल्या शरीरावर गोंदवले आहेत. देश विदेशात तसेच दिल्ली पासून कन्याकुमारी पर्यंत मदतकार्य करून देवदूत ठरलेल्या या तानाजी भाऊं बद्दल चला थोडक्यात जाणून घेऊया..!

डॉ.तानाजी भाऊ जाधव एक असे दैवी व्यक्तीमत्व की ज्यांच्या सोबत सेल्फी घेण्यासाठी हजारो युवकांचा गराडा त्यांच्या भोवती नेहमी होतो. ते पुढे निघाल्यास शेकडो गाड्यांचा ताफा नकळत त्यांच्या सोबत जोडला जातो. ना कोणाचा राजकीय वरदहस्त, ना सेलिब्रिटी.. परंतु मोठमोठ्या सेलिब्रिटींना देखील हेवा वाटावा असा रूबाब..! आत्ताच्या घडीला देश विदेशातील युवकांमध्ये सर्वाधिक क्रेझ असणारे नाव म्हणजेच डॉ.तानाजी भाऊ जाधव उर्फ टायगर हे होय.

तानाजी गोकुळ जाधव यांचा जन्म २ नोव्हेंबर रोजी झाला. घरची परिस्थिती अत्यंत बेताची होती. लहानपणापासून कष्ट करत शिक्षण घ्यावे लागले. खडतर कष्टातून प्रवास करत असताना जेमतेम शिक्षण झालं. सुरूवातीपासून व्यायामाची त्यांना प्रचंड आवड होती. थोरले बंधू वस्ताद जालिंदर भाऊ जाधव यांनी त्यांना कुस्तीचे धडे दिले. त्यामुळे कुस्ती हा त्यांचा आवडीचा खेळ होता. लहानपणापासूनच आपण या समाजाचं काहीतरी देणं लागतो; ही भावना मनात घर करून बसली होती. परंतु समाजाची सेवा करायची असेलतर तीही अगदी प्रामाणिकपणे आणि कोणत्याही राजकीय पक्षाचा आधार न घेता करायची हे मात्र निश्चित झालं. मित्र जमवणं व टिकवणे या त्यांच्या सुप्त गुणांची त्यांना जाणीव झाली.

तानाजी भाऊ यांचे थोरले बंधू वस्ताद जालिंदर भाऊ यांनी सन २००६ मध्ये टायगर ग्रुपची स्थापना केली आणि करमाळा या दुष्काळग्रस्त छोट्याशा खेड्यातून सामाजिक चळवळीची पाया भरणी झाली. तानाजी जाधव यांचे मित्र जमविण्याचे रत्नपारखी कौशल्य बघून या टायगर ग्रुपच्या अध्यक्ष पदाची धुरा संस्थापक वस्ताद जालिंदर भाऊ जाधव यांनी तानाजी यांचेकडे सोपवली. आता ग्रुपच्या माध्यमातून परिसरातील लोकांच्या अडचणी सोडवण्याचं व मदत करण्ययाचं कार्य जोमात झालं. अनेकांची कोर्टात गेलेले विविध वाद टायगर ग्रुपच्या मध्यस्थीने मिटले. अनेकांची घटस्फोटाची प्रकरणे मिटून पुन्हा समेट घडवून आणण्यात डॉ.तानाजी जाधव यशस्वी झाले व असंख्य कुटूंबे आनंदाने नांदू लागली. गावोगावी शेकडो तरूण या चळवळीने झपाटले. एक विचाराने जमलेले तरूण भाऊंच्या मार्गदर्शनाखाली निस्वार्थी समाजसेवा करू लागले. त्याचवेळी तानाजी भाऊ यांचे चुलत बंधू संदीप उर्फ पिंटू जाधव यांचा रस्ते अपघातात तातडीची मदत न मिळाल्याने मृत्यू झाला. आपल्या भावाला तातडीची मदत न मिळाल्याची खंत त्यांच्या मनात घर करून राहिली. वेळेत रस्ते अपघातात मदत मिळाली असती तर त्यांच्या भावाला जीवदान मिळाले असते, हे त्यांच्या लक्षात आले. आपल्या कुटूंबातील हे दु:ख ओळखून त्यांनी हे दु:ख इतर कोणाच्या वाट्याला येऊ नये यासाठी प्रयत्न करण्याचं ठरवलं. यासाठी त्यांनी टायगर ग्रुपचा विस्तार करमाळा तालुक्यापासून सोलापूर जिल्ह्या पर्यंत केला. आता जिल्ह्यात रस्ते अपघात झाल्यास टायगर ग्रुपला संपर्क करून लोक तातडीची व मोफत मदत मिळवू लागले. लोकांचा लाभणारा उदंड प्रतिसाद बघून व गरज ओळखून तानाजी जाधव यांनी टायगर ग्रुपचा विस्तार राज्यभर केला. कामाची व्याप्ती देखील वाढवली. मदत कार्याचे प्रकार वाढले. गरज येथे मतदकार्यासाठी तानाजी जाधव यांनी सर्व स्वयंसेवकांना धडे दिले. सध्या या टायगर ग्रुपचे एका महाकाय वटवृक्षात रूपांतर झाले असून दिल्लीपासून कन्याकुमारी पर्यंत टायगर ग्रुपचा विस्तार झाला आहे. विविध देशांमध्ये टायगर ग्रुपच्या कार्याचा बोलबाला असून दुबईमध्ये देखील भारतीय लोकांना मदत करण्यासाठी टायगर ग्रुप मोलाचे कार्य करत आहे.

आज भारतात सुमारे २५ लाखा पेक्षा अधिक सक्रिय सभासद असून सुमारे ७ राज्ये, ६३ जिल्हे आणि ७५०० गावांमध्ये टायगर ग्रुपचा परिपूर्ण विस्तार झालेला आहे. एखाद्या ठिकाणी अपघात झाल्यास तेथे तातडीने मदतकार्य करून हजारो लोकांचे प्राण वाचविण्याचे महान कार्य या ग्रुपच्या माध्यमातून घडत असल्याचे ते अभिमानाने सांगतात. आत्तापर्यंत महाराष्ट्रील १९,७०० अपघातग्रस्त व्यक्तींना मदतीचा हात मिळाला आहे. यामुळे शेकडो रूग्णांना जीवदान मिळाले. अपघाग्रस्त व्यक्तीला बऱ्याचदा तातडीने योग्य रक्तगटाचे रक्त मिळत नाही; ही अडचण सोडविण्यासाठी त्यांनी टायगर ग्रुपच्या पदाधिकारी व सदस्यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वत्र मोठमोठी रक्तदान शिबीरे व आरोग्य शिबीरे भरविण्याचे आवाहन केले. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत देशभर टायगर ग्रुपच्या प्रत्येक सदस्याच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत.

कोरोना महामारीच्या काळात तानाजी भाऊंच्या वाढदिवसानिमित्त सुमारे पाच हजार पिशवी रक्तदान करून राज्याला आणीबाणीच्या प्रसंगी मोठा आधार दिला. मागील दशकात सुमारे ३५०० भव्य रक्तदान शिबीरे संपन्न झाली. यामध्ये ४५,७४० रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान केले आहे. कोरोना महामारीच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेदरम्यान ग्रुपच्या वतीने महाराष्ट्र व गुजरात येथील सात सरकारी रूग्णालयांना ऑक्सीजन सेवा पुरवण्यात मोलाचा हातभार लावला. अटीतटीच्या प्रसंगी डॉ.तानाजी जाधव यांनी स्वत: आपल्या ग्रुपचे नेतृत्व करत सुमारे ५८४० मृतदेहांवर जाती धर्माचा विचार न करता आपापल्या परंपरेनूसार अंत्यसंस्कार केले. परदेशात देखील अनिवासी भारतीय टायगर ग्रुपच्या माध्यमातून जोडले गेले आहेत.

आयुष्यात मित्र चांगले असले की, त्या माणसाला शक्यतो अडचणींचा सामना करावा लागत नाही. मित्रांच्या मदतीने आलेल्या अडचणींवर मात करता येते म्हणूनच भाऊ नेहमी म्हणतात की, माझा हात धरून चला.. तुम्हाला कोणाचे पाय धरण्याची वेळ येणार नाही ! आज रोजी भाऊंच्या मोबाईलमध्ये ५ लाखाहून अधिक मित्रांचे नंबर सेव्ह आहेत. यामध्ये सर्वसामान्यांपासून आयएएस, आयपीएस, आयुक्त, जिल्हाधिकारी, तहसीलदार, मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक, समाजातील प्रतिष्ठीत व्यक्ती यांचा समावेश आहे. हे सर्व तानाजी भाऊंच्या समाजकार्याने परिचित असल्याने अडचणीच्या वेळी मदत करण्यास तत्पर असतात.

देशभर टायगर ग्रुपच्या माध्यमातून अनाथ आश्रमात अन्नदान व कपडे वाटप, वृध्दाश्रमात अन्नदान व कपडे वाटप, गोशाळेत चारा वाटप, शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, गरजू शालेय मुलींना मोफत सायकल वाटप, गरजू महिलांना शिलाई मशीन वाटप, साडी वाटप करून महिलांचा सन्मान, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, माळरानावर वृक्षारोपण, फळझाडे लागवड, विविध गुणकारी औषधी वृक्षांची लागवड, रक्तदान शिबीर, रूग्णालयात फळवाटप, गोरगरीबांना ब्लँकेट वाटप, गोरगरीबांना मोफत किराणा व भाजीपाला वाटप, दिवाळी फराळ वाटप, मोफत आरोग्य शिबीर, नेत्र तपासणी शिबीर, दिव्यांग व्यक्तींना मोफत व्हीलचेअर व विविध उपयोगी साहित्य वाटप तसेच अंधांना काठी व विविध प्रकारचे साहित्य वाटप, बेरोजगारांसाठी रोजगार मेळावे यासारखे असंख्य उपक्रम टायगर ग्रुपच्या सदस्यांच्या वाढदिवशी आयोजित केले जातात. वाढदिवसानिमित्त अनेक अनाथ मुलांना ग्रुपच्या माध्यमातून दत्तक घेतले असून त्यांचा सर्व खर्च ग्रुपच्या माध्यमातून केला जातो. अनेक आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांचा शैक्षणिक खर्च देखील टायगर ग्रुपच्या धेय्याने झपाटलेले तरूण गरज तेथे मदत करण्यासाठी सदैव तत्पर आहते. विविध ठिकाणी यात्रा उत्सव काळात गर्दीच्या ठिकाणी पोलिसांचे मदतनीस म्हणून शासनास मदत करत असतात. तर सण उत्सव काळात स्वच्छतादूत म्हणून सेवा देतात. देशभरात टायगर ग्रुपचे सदस्य वाढदिवसानिमित्त जे जे उपक्रम राबवितात त्याचा लेखाजोखा कार्य अहवाल व प्रकाशित झालेल्या बातम्या आपल्या लाडक्या तानाजी भाऊंना देऊन शाब्बासकी मिळवतात.

ग्लोबल वॉर्मिंगच्या धोक्याला आळा घालण्यासाठी टायगर ग्रुपने मागील १२ वर्षात ७ जिल्ह्यात सुमारे ९ लाख झाडे लावली असून त्यांची देखभाल केली आहे. डॉ.जाधव यांनी ६७२० गरीब, गरजूंना कपडे, औषधोपचार, व्हीलचेअर, श्रवणयंत्र व चष्मे यांचे मोफत वितरण केले. हा ग्रुप संपूर्ण महाराष्ट्रात १३ अनाथ आश्रम व वृध्दाश्रम चालवत आहे. याशिवाय आळंदी येथील आनंद तरंग हे बालसंगोपन केंद्र देखील चालवत आहे. समाजसेवा या एकविचाराने एकत्र आलेले हे तरूण टायगर ग्रुपच्या माध्यमातून क्रांती घडवत असून १६ पेक्षा अधिक ॲम्बुलन्स टायगर ग्रुपच्या माध्यमातून राज्यभर सेवा देत आहेत.

कोल्हापूर, सांगली भागात २०१८ साली पुरस्थिती निर्माण झाली होती. यावेळी देखील टायगर ग्रुपने सुमारे ३८ ट्रक जीवनावश्यक साहित्यांची मदत केली. येथे चार दिवस थांबून अनेकांना स्थलांतरासाठी मदत केली व ठिकठिकाणी मदत केंद्र उभारून मोफत अन्नछत्र स्थापन केले. केरळ महापुरात देखील रेल्वेच्या स्पेशल बोगी बुक करनू महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला. यावेळी केरळ सरकारला मदत निधी म्हणून सुमारे ११ लाख ३८ हजार रूपयांचा मदत निधी देखील सुपूर्द केला. कोकणातील चिपळूण, महाड, खेड येथे जी पुरस्थिती निर्माण झाली होती, तेथे टायगर ग्रुपच्या सहकाऱ्यांनी तळ ठोकून बचाव कार्यात सक्रिय सहभाग नोंदवला व मदतकार्य करून अनेकांचे प्राण वाचवले. सुमारे २४ ट्रक जीवनावश्यक साहित्य, कपडे, अन्नधान्य, ब्लँकेट, फास्ट फूड, औषधोपचार साहित्य आदींचा पुरवठा केला. मोफत अन्नछत्र उभारले व महाड, चिपळूण दुर्घटनेतून लोकांना मदत करण्याचे महान कार्य केले.

भारतात गोमातांची पुजा केली जाते. तर बऱ्याचदा या गायी छुप्या मार्गाने कत्तलीसाठी जात असल्याचे जाधव यांच्या निदर्शनास आले. त्यांनी रस्ते वाहतुकीतून कत्तलीसाठी जाणाऱ्या शेकडो गोमातांची सोडवणूक केली व संबंधित इसमावर गुन्हे दाखल करण्यास पोलीसांना भाग पाडले. आजही टायगर ग्रुपचे पदाधिकारी गो तस्करांवर नजर ठेवून जागता पहारा ठेवत आहेत.

टायगर ग्रुपचा विस्तार महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेश, कर्नाटक, गोवा, केरळ यासारख्या अनेक राज्यात झालेला दिसतो. तानाजी जाधव यांचे कार्य बघून व त्यांची वाढती क्रेझ व सामाजिक कार्य ओळखून अनेक पक्षांनी त्यांना राजकारणात येण्याची ऑफर दिली. खासदारकी वा महत्वाच्या महामंडळावर घेण्याचे किवा कुस्ती महामंडळ देण्याचे आश्वासन दिले. परंतु तानाजी भाऊंनी 'सर्वासोबत सलोख्याचे संबंध ठेवून मला फक्त आणि फक्त समाजसेवाच करायची आहे. राजकारण हा माझा पिंड नाही ' असे सांगून राजकारणाप्रती नापसंती दर्शवली. आज देखील तानाजी भाऊ युवकांना निर्व्यसनी रहा, व्यायाम करा, आपल्या उत्पन्नातील काही भाग गोरगरीबांसाठी खर्च करा, गुन्हेगारी पासून दूर रहा. साामजिक बांधिलकी जोपासा व देशाच्या आर्थिक जडणघडणीत भरीव योगदान द्या व आपल्या देशाची मान उंचावेल असेच काम करा; असा मोलाचा संदेश देतात. बेरोजगारीचे सावट दूर करण्यासाठी भाऊंनी टायगर ग्रपुच्या माध्यमातून रोजगार मेळावे आयोजित करून सुमारे २५ हजार हून अधिक बेरोजगारांना नामांकीत कंपन्यांमध्ये रोजगार उपलब्ध करून दिला आहे. भाऊंच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन २०१७ साली वी केअर फाउंडेशनच्या वतीने पुणे येथे राज्यस्तरीय सामाजिक कार्याबद्दल 'सोशल वर्कर' पुरस्कार दिला. २०१८ साली भूमाता फाउंडेशनच्या वतीने पुणे येथे 'क्रांतिवीर' पुरस्कार मिळाला. २०२१ मध्ये सरदार उध्दम सिंग फाउंडेशन परभणी यांच्याकडून 'जननायक' पुरस्काराने गौरविण्यात आले. मुंबई येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे बंधू प्रल्हाद दामोदरदास मोदी यांचे प्रमुख उपस्थितीत सामाजिक उपक्रमांची दखल घेऊन 'नेल्सन मंडेला नोबेल शांती पुरस्कार' देऊन भाऊंचा गौरव करण्यात आला. प्रल्हाद मोदी यांनी देखील टायगर ग्रुपच्या कार्याबद्दल विशेष कौतूक केले. अमेरिकन युनिर्व्हसिटी ऑफ ग्लोबल पिस यांनी तानाजी जाधव यांना सामाजिक कार्याची दखल घेत 'डॉक्टरेट' पदवी प्रदान केली. डॉ.तानाजी भाऊ जाधव हे दैनिक समर्थ गावकरी या वृत्तसमुहाचे समुह सल्लागार आहेत. तसेच महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे यांच्या सोबत ग्रामीण पत्रकारांना न्याय देण्याचे मोलाचे कार्य देखील करत आहेत. आयुष्यात शिक्षण हेच सर्वस्व नसून अल्प शिक्षण झालेल्या या युवकाने संपूर्ण भारतातील तरूणांपुढे आगळा वेगळा आदर्श निर्माण केला आहे. त्यांनी लाखो समाजसेवक घडवले असून ते स्वत: एक चालते-फिरते समाजसेवक घडवणारे विद्यापीठ आहे. त्यांच्या कार्यालयात येणाऱ्या प्रत्येकाची अडचण सोडविण्यासाठी ते नेहमी तत्पर असतात. म्हणूनच ते कोणतीही अडचण असो, जात पात धर्म न पाहता मदतीसाठी धावून जाणारे तानाजी भाऊ हे देवदूत ठरले आहेत. त्यांच्या महान कार्यास हार्दिक शुभेच्छा !

---

करमाळ्या दररोज रस्त्याने जाता येता अनेक ओळखीची व अनोळखी माणसे भेटतात. तानाजी भाऊंना ऑफिस मध्ये भेटून त्यांची फार महत्वाची कामे झाल्याचं सांगतात. गोरगरीब लोकांच्या चेहऱ्यावरील आनंद बघून खूप समाधान मिळतं आणि तानाजी करत असलेल्या कामाचा अभिमान वाटतो. त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर दोन्ही भावांनी एकमेकाला आधार दिला. खचून न जाता कष्ट करून वाटचाल सुरू ठेवली. त्यांनी परोपकारी भावनेतून अनेक चांगली माणसं जोडून टायगर ग्रुपचे महाकाय वटवृक्षात रूपांतर केले. त्याच्या वाढदिवशी होणारी गर्दी हिच खरी त्यांच्या कामाची पावती आहे.

**– पुतळाबाई जाधव (डॉ.तानाजी जाधव यांच्या मातोश्री)**

---

टायगर ग्रुपच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी तानाजी जाधव यांचेकडे दिल्यापासून त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. टायगर ग्रुपच्या ध्येय धोरणांना यशस्वी करण्यासाठी संपूर्ण देशभर फिरून ग्रुपची बांधणी केली. ग्रुपच्या आजच्या या यशात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

**– जालिंदर भाऊ जाधव (संस्थापक, टायगर ग्रुप)**

---

तानाजी जाधव यांचे समाजकार्य हे विश्व कल्याणकारी आहे. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' या उक्तीप्रमाणे त्यांचं कार्य सुरू आहे. कुठल्याही फळाची अपेक्षा न करता ते करत असलेले हे समाजकार्य करण्यासाठी परमेश्वर त्यांना निरंतर शक्ती देवो..!

**– श्रीश्री रविशंकर (अध्यात्मिक गुरू, आर्ट ऑफ लिव्हींग)**

---

तानाजी जाधव यांच्या समाजकार्याने देश सुपरिचित आहे. खरंतर स्वामी समर्थच त्यांच्याकडून ही अनोखी सेवा करवून घेत आहेत. त्यांच्या निरपेक्ष समाजकार्याने लाखो युवकांना या सेवेमध्ये येण्यासाठी प्रवृत्त केले आहे. यामुळे लाखो समाजसेवक घडले आहेत.

**– प.पू.आण्णासाहेब मोरे गुरूमाऊली**
**(श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक विकास मार्ग, दिंडोरी प्रणित)**

---

तानाजी जाधव यांचं समाजकार्य देशासाठी अभिमानास्पद आहे. देशविदेशात टायगर ग्रुपकडून लोकांना मिळणारी मदत ही थक्क करणारी आहे. त्यांना त्यांच्या या चांगल्या कामाचे फळ देखील नक्कीच मिळेल. **– प्रल्हादभाई मोदी (पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे बंधू)**

---

तानाजी जाधव यांनी देशभर समाजकार्य व आरोग्याप्रती जनजागृती केली. त्यामुळे तरूणांमध्ये असणारी ऊर्जा योग्य दिशेला सत्कारणी लागली. आजचा तरूण हा अनुकरणप्रिय आहे. निर्व्यसनी रहा, व्यायाम करा, आपल्या उत्पन्नातील काही भाग गोरगरीबांसाठी खर्च करा, गुन्हेगारी पासून दूर रहा, सामाजिक बांधिलकी जोपासून देशाच्या जडणघडणीत भरीव योगदान द्या. तानाजी भाऊंनी तरूणांना दिलेला संदेश मोलाचा आहे.

**– मदन महाराज गोसावी (सुप्रिम कोर्टाचे नि.न्यायाधीश)**

---

राजकारणासाठी परिस्थिती अनुकूल असून सुध्दा तानाजी भाऊंनी समाजकारण सोडले नाही. त्यांनी जी अविरत समाजकार्याचा ध्यास घेतला आहे तो गौरवास्पद आहे. सामाजिक कामे करून देखील अत्युच्च शिखर गाठता येते, हे तानाजी भाऊंचे एक उदाहरण आहे..!

**– पद्मश्री डॉ.चंद्रकांत पांडव (आयोडीन मॅन ऑफ इंडिया)**

---

तानाजी भाऊ यांची दुबईत देखील मोठी क्रेझ आहे. भारतातून दुबईत नोकरी, व्यवसायानिमित्त आलल्या लोकांची दुबईत फसवणूक होऊ नये म्हणून आम्ही दुबईत टायगर ग्रुपची शाखा सुरू केली आहे. याला भारतीयांचा देखील मोठा प्रतिसाद मिळत आहे. येथे शेकडो भारतीयांना या ग्रुपच्या माध्यमातून मदत मिळत आहे. अडचणीच्या काळात आपले कोणीतरी दुबईत मदत मिळवून देत असल्याने भारतीयांना दिलासा वाटत आहे.

**– आर.सी.जव्हेरी (रॉयल फॅमिली ॲडव्हायझर, दुबई)**

---

महाराष्ट्रात पुर आपत्ती ओढवली होती. राज्य पत्रकार संघाच्या वतीने मदतीचे दोन कंटेनर साहित्य घेऊन जात असताना टायगर ग्रुपचे मदतकार्यासाठी निघालेले १०-१२ ट्रक रस्त्याने दिसले. अपत्तीग्रस्त चिपळूनमध्ये पोहचल्यावर पुरग्रस्त भागात शेकडो टायगर ग्रुपचे स्वयंसेवक जीवाची बाजी लावून मदतकार्य करताना पाहिले. हे स्वयंसेवक पहिल्या दिवसापासून मदत कार्यासाठी तळ ठोकून होते. एवढी मोठी मदत करून देखील या ग्रुपला तशी प्रसिध्दी मिळत नसल्याची खंत वाटली. अन् टायगर ग्रुपच्या अध्यक्षांना भेटण्याची इच्छा निर्माण झाली. तानाजी भाऊंना माणसांची फार पारख असून ते रत्नपारखी स्वभावाचे असल्याचे पहिल्याच भेटीत कळलं अन् त्यांच्याकडे चांगली माणसं जोडण्याची कला असल्याने त्यांनी मला कधी आपलेसे केलं आणि मी कधी त्यांचा झालो हे मला कळलेच नाही. दिलदार तानाजी भाऊंना वाढदिवसाच्या शुभेच्छा ! **– डॉ.विश्वासराव आरोटे**
**(राज्य सरचिटणीस, म.रा.मराठी पत्रकार संघ)**

---

तानाजी जाधव व त्यांचा टायगर ग्रुप हे त्यांच्या सामाजिक कार्यासाठी परिचित आहे.मी पोलीस दलात कार्यरत असताना त्यांच्याशी ओळख झाली. त्यांनी कधीही चुकीच्या गोष्टींचे समर्थन केले नाही. तसेच एखाद्यया पदाधिकाऱ्याने टायगर ग्रुपच्या नावाचा गैरवापर केल्यावर देखील कधीही पाठराखण केली नाही. त्यांचं सुरू असलेले समाजकार्य असेच पुढे सुरू राहो..!

**– आयपीएस मनोज लोहिया (नि.पोलीस आयुक्त, छ.संभाजीनगर)**

---

तानाजी भाऊंनी माईच्या परिवारावर खूप प्रेम केले. माईंच्या सुख-दु:खात तुम्ही नेहमी असायचा. माई गेल्यानंतरही आज सुध्दा तुम्ही ते प्रेम कमी होऊ दिलं नाही. संस्थेला काय अडचण वगैरे तर नाही ना ? मुलं बरी आहेत ना ? अशी सतत तुम्ही विचारपूस करत असता. मैत्रीच्या दुनियोतील राजा माणूस अशी तुमची ओळख तुमच्या स्वभावाने तुम्ही सार्थ करून दाखवली.

**– विनय सपकाळ (अनाथांची माय सिंधूताई सपकाळ यांचे सुपुत्र)**

---

खरं तर 'आपली माणसं' या माझ्या सेवाभावी संस्थेमुळे तानाजी भाऊंची अन् माझी ओळख झाली. तानाजी भाऊंनी आरोग्य क्षेत्रामध्ये फार महान कार्य केले आहे. त्यांनी शेकडो गरीब व गरजू रूग्णांना माफक दरात तसेच मोफत उपचारासाठी मदत मिळवून देण्यासाठी, मला अनेकदा फोन करून मदत घेतली आहे. गोरगरीबांना माफक दरात वैद्यकिय सेवा मिळवून देण्यासाठी या माणसाची खरी तळमळ मला पाहायला मिळाली.

**– डॉ.ललवाणी (डायरेक्टर, डेक्कन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल पुणे)**

---

**शब्दांकन : नवनाथ जाधव**
(राज्य प्रसिध्दीप्रमुख - म.रा.मराठी पत्रकार संघ)


WASHIMBEKAR
Saraf & Son's
सोने व चांदीच्या दागिन्यांच्या खरेदीवर
हमखास गिफ्ट
वाशिंबेकर
सराफ अ‍ॅन्ड सन्स
सुनिल तुकाराम वाशिंबेकर
९४२१०६२८६२
शेखर सुनिल वाशिंबेकर
८४५९००३४२८
सुभाष चौक, डॉ. पुंडे हॉस्पीटल शेजारी, राशिन पेठ, करमाळा, जि.सोलापूर - ४१३२०३


ओंकार शिंदे
02 NOV
टायगर ग्रुप महाराष्ट्र अध्यक्ष
मा.श्री.डॉ.तानाजी भाऊ जाधव
आपणांस उदंड आयुष्याच्या अनंत शुभेच्छा...!
शुभेच्छुक : समस्त कानाड गल्ली मित्र परिवार, करमाळा.

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



# जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

- **नेपाळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी) वाराणसी, गोरखपूर, प्रयागराज, काठमांडू, मनोकामना, लुंबिनी, अयोध्या, पोखरा
- **काशी दर्शन** काशी, गया, आयोध्या, प्रयाग
- **गुजरात दर्शन** गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम, अक्षरधाम, स्टेयु ऑफ युनिटी, सरदार वल्लभभाई पटेल पुतळा — कालावधी : दि.३/१/२०२५ ते ११/१/२०२५ — सहल खर्च : रू.१४,०००
- **कन्याकुमारी दर्शन** कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी — कालावधी : दि.१६/१/२०२५ ते २६/१/२०२५ — सहल खर्च : रू.१३,८००
- **गंगासागर दर्शन** गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ — कालावधी : दि.३०/१/२०२५ ते ७/२/२०२५ — सहल खर्च : रू.१२,८००
- **केरळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी) कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, मधुराई, रामेश्वरम् — कालावधी : दि.११/२/२०२५ ते २३/२/२०२५ — सहल खर्च : रू.३१,५००
- **वैष्णोदेवी, काश्मिर, अमृतसर दर्शन** माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ. — सहल खर्च रू.२६,००० — कालावधी : दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५
- **वैष्णोदेवी दर्शन** माता वैष्णोदेवी, शिवखोरी, जम्मू अमृतसर, अटारी बॉर्डर, दिल्ली — कालावधी : दि.९/३/२०२५ ते १७/३/२०२५ — सहल खर्च : रू.१३,८००
- **मथुरा दर्शन** मथुरा, आग्रा, गोकुळ, वृंदावन, बरसाना, गोवर्धन पर्वत, नंदगाव — कालावधी : दि.२२/३/२०२५ ते २८/३/२०२५ — सहल खर्च : रू.९,१००

• रेल्वे प्रवास • बस प्रवास
• भोजन व्यवस्था • राहण्याची उत्तम सोय



बुकींग सुरू

संपर्क श्री.मयुर राऊत
मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८


# बागायत जमीन व बंगला विकणे आहे

मांगी येथील साडेसात एकर बागायत जमीन
(तीन बोअर, एक विहिर, चार इंची तळ्यावरून पाईप लाईन)
तसेच सर्व सुविधायुक्त असलेला बायपास रोडलगत हायवे टच असलेला
दोन मजली बंगला योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे

**संपर्क : मो.7709350035**

पान १ वरून पुढे..

## करमाळा विधानसभा - ३१ उमेदवारांची अंतिम यादी जाहीर - ४ अर्ज छाननीत बाद

(म्हैसगाव, अपक्ष), धिरज माणिक कोळेकर (कुर्डूवाडी, अपक्ष), यशवंत संजयमामा शिंदे (निमगाव ह , अपक्ष), शहाजान पैगंबर शेख (कुर्डूवाडी, बहुजन महा पार्टी), रामदास मधुकर झोळ (वाशिंबे, अपक्ष), मधुकर गणपत मिसाळ (बाळेवाडी, बहुजन मुक्ती पार्टी), भानवसे गणेश अभिमान (वांगी नं.२, अपक्ष), विनोद दिलीप सितापुरे (करमाळा, अपक्ष), जालिंदर वाल्मिक कांबळे (पोफळज, अपक्ष), ॲड.मोहम्मद जमीर कलिंदर शेख( जिंती, अपक्ष), सुहास शिवमुर्ती ओहोळ (करमाळा, अपक्ष), डॉ.सुजित काशिनाथ शिंदे (करमाळा, अपक्ष), अतुल भैरवनाथ खुपसे (उपळवटे, अपक्ष), बाळासाहेब मच्छिंद्र वळेकर (निंभोरे, अपक्ष), अशोक ज्ञानदेव वाघमाडे (निलज, न्यु.राष्ट्रीय समाज पार्टी)

## करमाळा येथे मुळव्याध शिबीरात ८१ रूग्णांची तपासणी

करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरामध्ये जाधव-पाटील हॉस्पिटलमध्ये हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ.रोहन पाटील यांच्या आई कमलाभवानी सामाजिक उहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून मुळव्याध तज्ञ डॉ.प्रदीप तुपेरे व त्यांचे समवेत असलेल्या नामांकित डॉक्टर व त्यांची टीम यांच्या मार्गदर्शनाखाली मुळव्याध संबंधीच्या आजाराविषयी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात ८१ रूग्णांनी सहभाग नोंदवला. मुळव्याध संबंधीच्या आजाराविषयी विविध तपासण्या करून काही ऑपरेटिव्ह असणाऱ्या नागरीकांचे ऑपरेशन करण्यात आले. या सर्व सुविधा नाममात्र दरामध्ये या शिबीरात देण्यात आल्या. जाधव-पाटील हॉस्पिटल मध्ये येथून पुढेही करमाळा तालुक्यातील नागरीकांसाठी अशा प्रकारच्या वेगवेगळ्या रोगासंबंधीच्या शिबीरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे डॉ.रोहन पाटील यांनी सांगितले.

शिबीर यशस्वी करण्यासाठी सचिव अभिजीत पाटील, डॉ.शिवानी पाटील, अजिंक्य पाटील, तात्यासाहेब जाधव, प्रमोद जगदाळे, महादेव भोसले यांनी परिश्रम घेतले.


## निवडणुकीबाबत पदाधिकाऱ्यांना विचारात घेऊनच भुमिका स्पष्ट करणार : संजय घोलप



करमाळा(सं.प्र.): विधानसभा निवडणुकीत मनसेने अधिकृत उमेदवार दिलेला नाही. त्यामुळे होऊन घातलेल्या विधानसभा निवडणुकीत कोणाचा प्रचार करायचा, याचा निर्णय सर्व मनसैनिक व पदाधिकाऱ्यांना विचारात घेऊनच भुमिका स्पष्ट करू; असे प्रतिपादन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष संजय घोलप यांनी केले. याबाबत ते म्हणाले, की महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उमेदवारी मिळावी म्हणून सोलापूर येथे राजसाहेब ठाकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या मेळाव्यात इच्छा व्यक्त केली होती. तरी पक्षाच्या काही वरीष्ठ पदाधिकाऱ्यांनी येथे उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला असलातरी आपला मतदारसंघातील मनसेने पाच वर्षात बरेच लोकहिताची कामे केली असून पक्षाला व राजसाहेब ठाकरे यांना मानणारा मतदार असून ते सध्यातरी संभ्रमात असल्याचे दिसून येत आहे. बरेचजणांचे फोन पण येत आहेत. त्यामुळेच सर्व पदाधिकाऱ्यांसह मनसे सैनिक वरीष्ठ पदाधिकारी यांना विचारूनच भुमिका स्पष्ट करू व आपला विचाराचा व जनतेच्या व तालुक्यातील प्रश्नाची जाणीव असणाऱ्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी प्रयत्न करू; असेही श्री.घोलप यांनी सांगितले.

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!

# चिवटे उपहारगृह



| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर | पुरी भाजी | पावभाजी | पाणीपुरी | पेढा, बर्फी | फरसान |
| उडीदवडा सांबर | मिसळ पाव | तवापुलाव | स्पे.भेळ | लाडू, जामून | शेव |
| उत्तप्पा | पोहे/उपमा | सँडविच | रगडा पॅटिस | मैसुरपाक | स्पे.चिवडा |
| डोसा | दहीवडा/शिरा | फिंगर चिप्स | राज कचोरी | काजू कतली | पापडी |

**डेअरी:** दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी

साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.

एकवेळ अवश्य भेट द्या..!

राशिनपेठ, करमाळा. मो.९००६९४३००६

**कोल्ड्रींक:** कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम

# शेलगाव (क) येथे शिंदे व बागल गटाच्या कार्यकर्त्यांचा पाटील गटात प्रवेश



करमाळा (सं.प्र.): महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण पाटील यांची शेलगाव (क) येथे प्रचार सभा संपन्न झाली. या सभेत विविध गावातील विविध गटातील (शिंदे व बागल गट) कार्यकर्त्यांनी माजी आमदार नारायण पाटील यांच्या गटात तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. यामध्ये शेलगाव क येथील आत्माराम वीर, हनुमंत वीर, भुजंग वीर, बाबुराव माने, अरूण काटूळे, मारूती वाघमारे, सौंदे येथील ज्योतिराम लावंड व कार्यकर्ते, हिसरे येहथील प्रकाश खरात, संजय राऊत, लक्ष्मण लोंढे, मिरगव्हाण येथील रामभाऊ ओहोळ, भागवत सुरवसे, सचिन लावंड, सोपान हाके, कालिदास डिसले, राजेंद्र सुरसे, नाथराव सुरवसे, बालाजी सुरवसे, भिमराव सुरवसे, शिवाजी पवार, लक्ष्मण पवार, रामदास शिंदे, लक्ष्मण शिंदे, बाळू शिंदे, सोमनाथ शिंदे, सचिन शिरसाट, बापूराव मोहोळ, अमोल सुरवसे आदींचा समावेश आहे.

यावेळी नारायण पाटील यांनी आपल्या भाषणातून शेलगाव(क) येथील वीज कपातीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडविणार तसेच उजनी-मराठवाडा बोगद्यातून शेलगाव क व इतर गावांना शेतीसाठी कायमस्वरूपी उचलपाणी परवाने मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले.

# घोटी येथील कार्यकर्त्यांचा आ.शिंदे गटात प्रवेश



करमाळा(सं.प्र.): घोटी येथील असंख्य कार्यकर्त्यांनी निमगाव येथील आ.संजयमामा शिंदे यांच्या निवासस्थानी जाऊन शिंदे गटात प्रवेश केला. यामध्ये जनसेवा पार्टीचे प्रमुख विष्णू ननवरे, धनाजी ननवरे, सोमनाथ ननवरे, प्रदीप वाघमारे, दत्तात्रय क्षीरसागर, सागर ननवरे, अनिल राऊत, कुंडलिक ननवरे, आजिनाथ ननवरे, नवनाथ यादव, शिवाजी कानडे, रमेश ननवरे, उमेश ननवरे, गजेंद्र शेंडे, महेश राऊत, भालचंद्र राऊत यांसेही अनेक कार्यकर्त्यांनी आ.शिंदे गटात प्रवेश केला. यावेळी आ.शिंदे यांचे हस्ते प्रवेश केलेल्या सर्वांचा फेटा बांधून गटात प्रवेश केला.

खुशखबर खुशखबर


मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात

**डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध**



बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ

**डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)**



**उपलब्ध सुविधा...**

● मुळव्याधवर इंजेक्शन ● डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब ● एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब ● संडासवाटे रक्त येणे, पु येणे ● संडासची जागा बाहेर पडणे ● संडास जागी खाज व आग होणे ● संडासाचा नागवेडा ● संडास नंतर बसण्यास त्रास होणे ● भगंदर, फिशर ● चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

**ओपीडी /ऑपरेशन ठिकाण**

दर गुरूवार व सोमवार

वेळ : सकाळी ९.०० ते १२.००

**लोकरे हॉस्पिटल**

कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर

(९८५०८५१००५)

**परिचय**

डॉ.विकास देविदास नागरगोजे

मुळव्याध तज्ञ

पदवी : नाशिक

पदवोत्तर : मुंबई



**ओपीडीचे वैशिष्ट्ये...**

● इंजेक्शन सुविधा ● लेझर सुविधा
● प्रभावी औषधी सुविधा ● मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
● मेडिक्लेम सुविधा उपलब्ध ● पार्किंगची व्यवस्था
● आठवड्यातून दोनदा ओपीडी

विशेष सुचना... १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# क.ता.शिक्षक पतसंस्थेच्या चेअरमन पदी अरूण चौगुले



करमाळा (सं.प्र.) : करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतंस्थेच्या चेअरमन पदी अरूण चौगुले यांची तर व्हा.चेअरमन पदी वैशाली महाजन व सचिव पदी सतिश चिंदे यांची निवड करण्यात आली आहे. परिविक्षाधीन उपनिबंधक सहकारी संस्था तथा अध्यासी अधिकारी अपर्णा यादव यांचे अध्यक्षतेखाली सहाय्यक निबंधक कार्यालय, करमाळा येथे सदर निवड पार पडली. यावेळी चेअरमन पदासाठी अरूण चौगुले यांचा तर व्हा.चेअरमन पदी वैशाली महाजन यांचा एक-एक अर्ज आल्याने दोघांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सदर पतसंस्थेची स्थापना १९४० साली झाली असून तिचे एकूण ६५० सभासद आहेत. ही संस्था अ वर्ग प्रकारात मोडते. यामध्ये ८ टक्के व्याजदराने ठेवी स्वीकारल्या जातात.

यावेळी प्रताप काळे, आदिनाथ देवकते, तात्यासाहेब जाधव, साईनाथ देवकर, अजित कणसे, पुनम जाधव, वसंत बदर, दिपक जाधव, रमेश नामदे, बाळासाहेब दुधे सह शिक्षक बांधव उपस्थित होते.

करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी

सोलापूर येथील **त्वचारोग तज्ञ**

**डॉ.संकेत मंडलेचा** MBBS, DDV (Pune)

**प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत**




**त्वचा विकार :** नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या,नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला

**संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक**
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर

**अपॉईंटमेंट : मो.9423333904**

**समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह**

डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)

डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)

**उपलब्ध सुविधा..** ● गरोदर माता तपासणी व उपचार ● सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर ● नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे ● मासिक पाळीचे आजार निदान व उपचार ● वंध्यत्व निवारण ● सिझेरियन प्रसुती ● गर्भशयाचे आजार निदान व उपचार ● मेनोपॉज क्लिनिक

**महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)**

● नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) ● व्हेंटिलेंटरची सोय
● बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) ● CPAP ● Pulsoximeter
● दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) ● वाफेची सोय (Nebulizer)
● बाल दमा निदान व उपचार ● सेंट्रल ऑक्सिजनची सोय ● 02 Concentrator

गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)


2 Nov
महाराष्ट्र राज्य टायगर ग्रुपचे अध्यक्ष
मा.श्री.डॉ. तानाजी(भाऊ) जाधव
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
श्री.नानासाहेब मोरे
(जि.उपाध्यक्ष, मनसे)
शुभेच्छुक
गुरूदत्त एंटरप्रायजेस्
बायपास रोड, कोळेकर कॉम्प्लेक्स
करमाळा., जि.सोलापूर.
श्री.भरत(भाऊ) आवताडे
(ता.अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस)


सोलापूर जिल्हा परिषदेचे कर्मचारी तसेच
सोलापूर जिल्हा परिषद सरकारी कर्मचारी पतसंस्थेचे
माजी चेअरमन
श्री.कालिदास बबन जोशी
यांना सेवानिवृत्ती निमित्त
उत्तम, निरोगी आयुष्यासाठी...
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
सुशेन ननवरे, पवन कालिदास जोशी, प्रविण कालिदास जोशी
वैशाली कालिदास जोशी, लंका कालिदास जोशी

# मलवडी येथे पाटील गटाला धक्का - असंख्य कार्यकर्त्यांचा शिंदे गटात प्रवेश



करमाळा(सं.प्र.) : मलवडी येथील माजी आमदार नारायण पाटील गटाला धक्का बसला असून, पै.बंडूनाना कोंडलकर, उपसरपंच साहेबराव दुर्गुळे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी पाटील गटाला सोडचिठ्ठी देत आमदार संजयमामा शिंदे यांच्या गटात प्रवेश केला आहे. शिंदे गटात या सर्वांचे स्वागत आ.संजयमामा शिंदे यांनी केले.

यावेळी बोलताना आ.शिंदे म्हणाले, की २०१७ पासून करमाळा तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी माझा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. विकासकामे करताना मी कधीही राजकारण केले नाही किंवा कोणाची अडवणूकी केलेली नाही. आरोग्य, रस्ता, वीज व शेतीचे प्रश्न सोडविण्यासाठी मी सतत कटिबध्द राहील. प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांनी निश्चंत रहावे. बंडूनाना तुमच्या पाठीशी खंबीरपणे भावासारखा उभा राहून तुम्हाला ताकद देणार असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी विजय पालवे, गुरूनाथ पालवे, राघू कोंडलकर, रमेश कोंडलकर, आबा कोंडलकर, रेवणनाथ कोंडलकर, सर्जेराव कोंडलकर, रवींद्र पालवे, सर्जेराव बागल, पप्पू कोळी, कल्याण सातव तसेच पाथुर्डी येथील सदाशिव तोडकर, हनुमान तोडकर यांचेसह अनेक कार्यकर्त्यांनी आ.शिंदे गटात प्रवेश केला. यावेळी माजी सभापती गोकुळ पाटील, ज्ञानेश्वर शेलार, माजी जि.प.सदस्य उध्दव माळी, चंद्रहास निमगिरे, माजी पंचायत समिती सदस्य विलास पाटील, सरपंच तानाजी झोळ, पै.उमेश इंगळे, राजेंद्र बारकुंड, म्हैसगावचे लक्ष्मण पाटील, खरेदी - विक्री संघाचे व्हा.चेअरमन प्रविण पाटील, कन्हेरगावचे धनंजय मोरे, मारूती पारखे, अच्युत तळेकर, सरपंच किरण फुंदे, सरपंच रविंद्र वळेकर घोटीचे सरपंच विलास राऊत, गुलाबराव देवकते, भाऊसाहेब खरात, अभिजीत तळेकर, पै.चेतन पाटील, सनी टकले, मयुर रोकडे, अशोक तकीक, गौतम ढाणे, सतीश पन्हाळकर, धनाजी शिंदे, गोरख तळेकर, नंदकुमार जगताप उपस्थित होते. सुरूवातीला मलवडी गावातून आ.शिंदे यांची घोड्यावरून मिरवणूक काढत फटाक्यांच्या आताषबाजीमध्ये सभास्थळी आगमन झाले.

# केम येथे गाईंचे पूजन व गो दिंडी सोहळा संपन्न

करमाळा(सं.प्र.): केम येथे वसुबारसचे औचित्य साधून गाईंचे पूजन व गो दिंडी सोहळ्याचे आयोजन केम ग्रामस्थ व गोरक्षकांकडून करण्यात आले. यामध्ये ५१ गाईंचे पूजन करण्यात आले. राज्य शासनाकडून नुकताच देशी गाईंना राज्यमातेचा दर्जा देण्यात आला आहे. या गोष्टीचा आनंद व्यक्त करण्यासाठी व गोमातेविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन गोरक्षकांकडून करण्यात आले.



महाराष्ट्रात प्रथमच...
गाडी,युपीएस इन्व्हर्टरसाठी नविन बॅटरी घेताय? बॅटरी बदलण्यापूर्वी तुमच्या जुन्या बॅटरीची तपासणी करा
आणि बॅटरी बदलण्याच्या त्रासापासून चिंतामुक्त व्हा... आता जुन्या बॅटरी चालतील नव्यासारख्या !
२ चाकी ३ चाकी ४ चाकी ट्रक ट्रॅक्टर JCB पोक्लेन सोलर
एकाच छताखाली सर्व प्रकारच्या सोलर इन्व्हर्टर बॅटरी सर्व्हिसेस
सुभद्रा पॉवर सोल्युशन्स
प्रोप्रा. श्री. स्वप्निल आदिनाथ आदलिंगे (ME Industrial Automation) 9172927337
श्री.आदिनाथ जयवंत आदलिंगे (मा.विस्तार अधिकारी, पंचायत समिती, करमाळा) 7588506719
शाखा नं.१ त्रिमुर्ती कुशन्स् शेजारी पुणे रोड,करमाळा / शाखा नं.२: मातोश्री कॉम्प्लेक्स, IDBI बँकेच्या पाठीमागे, श्रीदेवीचामाळ रोड, भवानी नाका, करमाळा.

# क्षितिज महिला ग्रुपकडून श्रीराम प्रतिष्ठानच्या लाभार्थ्यांना दिवाळी फराळ वाटप



करमाळा(सं.प्र.): करमाळा शहर व तालुक्यामध्ये सामाजिक कार्यात कायमच अग्रेसर असणाऱ्या श्रीराम प्रतिष्ठान संचलित अन्नपूर्णा योजनेतील लाभार्थ्यांना करमाळा येथील क्षितिज महिला ग्रुपच्या वतीने दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी ग्रुपच्या डॉ.सुनिता दोशी यांनी सांगितले, की आपल्या आयुष्यातील प्रकाश हा इतरांच्याही आयुष्यात निर्माण व्हावा; यासाठी जे हतबल व दुर्लक्षित घटक आहे; अशा वृध्द निराधार लोकांना आम्ही हे फराळ वाटप केले. परंतु याहीपेक्षा श्रीराम प्रतिष्ठान हे गेली आठ वर्षापासून अंखडीतपणे या वृध्द निराधार लोकांना मोफत जेवण देऊन त्यांची सेवा करतात हे खूप मोठे महान कार्य असून हे कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे. हे कार्य श्रीराम प्रतिष्ठानच्या माध्यमातून असेच वृध्दींगत राहा; अशा शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित लाभार्थ्यांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष गणेश चिवटे, सदस्य विलास जाधव, प्रमोद फंड, अमोल पवार, संदीप काळे, महादेव गोसावी तसेच क्षितिज ग्रुपच्या महिला उपस्थित होते.

# रमेश विश्वनाथ वीर हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन



करमाळा(सं.प्र.): करमाळा शहरातील रहिवाशी रमेश विश्वनाथ वीर (वय-५१) यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांचे मागे पत्नी, एक मुलगी, एक मुलगा, भाऊ, बहिण असा परिवार आहे. रमेश वीर हे कचेरी परिसरात बॉन्डरायटर संघटना तसेच महा-ई-सेवा केंद्राच्या माध्यमातून काम पाहत होते. पूर्वी करमाळा शहरातील वीर चौक येथे केबल नेटवर्कचा व्यवसाय होता. करमाळा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ विधिज्ञ अॅड.कमलाकर वीर यांचे ते बंधू होते. अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मस्कर अॅग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
मस्कर ट्रेडिंग कंपनी
आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर,
प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.
बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य
योग्य दरात मिळेल !
पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
• प्लंबींग • हार्डवेअर
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.



मेनरोड, करमाळा. रवि सोनी (9421029869) अजित सोनी (9423336932)




कै.साधनाबाई नामदेवराव जगताप शाळेचे माजी मुख्याध्यापक, आदर्श शिक्षक व आमचे पिताश्री

## मा.श्री.दत्तात्रय माधव चोपडे

दि.२/११/२०२४ रोजी ७५ व्या वर्षात प्रवेश करीत आहे. त्यांना उदंड आयुष्य लाभो, ही आमची प्रार्थना !

अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त

**हार्दिक शुभेच्छा !**

**शुभेच्छुक**

पत्नी - सौ.जयश्री दत्तात्रय चोपडे
मुलगा - श्री.नितीन दत्तात्रय चोपडे(मुलगा), श्री.नागेश दत्तात्रय चोपडे (एम.फार्मसी)
सुन - सौ.शितल नितीन चोपडे (सून), सौ.संध्या नागेश चोपडे (बी.फार्मसी)
जावई-श्री.प्रमोद अंकुश काळे (शिक्षक) मुलगी - सौ.स्वाती प्रमोद काळे
चोपडे (वीट), काळे (फिसरे), उरमुडे (करमाळा) परिवार व समस्त कानाडगल्ली, करमाळा.









शुभेच्छुक : टायगर ग्रुप महाराष्ट्र राज्य जनसंपर्क कार्यालय, करमाळा.


आशिर्वाद
आमच्या सर्व दूध उत्पादक शेतकरी, दूध संस्था चेअरमन, सभासद, कर्मचारी यांना दिपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
आशिर्वाद
कमलाई मिल्क & मिल्क प्रोडक्टस्
शाखा : करमाळा, वरकुटे, परांडा, उपळाई
सहकार महर्षी
चेअरमन, वि.का.सो.आळजापूर
झोनल मॅनेजर
डॉ.हरीदास केवारे
मा.संचालक, आदिनाथ स.सा.कारखाना
डॉ.दिपक केवारे
श्री.राजीव केंद्रे
केवारे हॉस्पिटल
मेनरोड, पोथरनाका, करमाळा.
फोन-२२०३१०, मो.७७६८९७९७३१
उपलब्ध सुविधा : ● ई.सी.जी. ● रक्त, लघवी तपासणी ● सर्व प्रकारचे लसीकरण
● सुसज्ज लॅबोरेटरी ● होमिओपॅथी उपचार ● बालरोग निदान व उपचार
● प्रसुतीपूर्व तपासणी ● आयुर्वेदिक उपचार
● भापकर डोळ्यांचे हॉस्पिटल अधिकृत ऑपरेशन केंद्र(फक्त लेन्सची फी भरणे)
डॉ.एच.टी.केवारे
D.M.& S.(R)
डॉ.दिपक एच. केवारे
B.A.M.S.
डॉ.सौ.प्रियंका दि. केवारे
B.A.M.S.
● शुभेच्छुक : कमलाई मिल्क ॲन्ड मिल्क प्रोडक्टस् ●


02 NOV
टायगर ग्रुप
महाराष्ट्र अध्यक्ष
मा.श्री.डॉ.तानाजी
भाऊ जाधव
आपणांस उदंड आयुष्याच्या
अनंत शुभेच्छा...!
शुभेच्छुक : टायगर ग्रुप महाराष्ट्र राज्य करमाळा शहर

# आ.शिंदे यांच्या गावभेट दौऱ्यास उत्स्फुर्त प्रतिसाद



करमाळा (सं.प्र.) : विधानसभा निवडणुकीसाठी आमदार संजयमामा शिंदे यांनी २८ ऑक्टोबर रोजी अपक्ष अर्ज दाखल केला आणि २९ ऑक्टोबर पासून करमाळा तालुक्यात गावभेट दौऱ्याला सुरूवात केली. आ.शिंदे यांनी श्रीदेवीचामाळ येथे दुपारी दोन वाजता प्रचाराचा नारळ फोडला. दिवसभरात त्यांनी श्रीदेवीचामाळ, हिवरवाडी, भोसे, वंजारवाडी, लिंबेवाडी, रावगाव या गावांना भेटी दिल्या. प्रत्येक गावात कार्यकर्त्यांनी आमदार संजयमामा शिंदे यांचे उत्साहात स्वागत केले. ३० ऑक्टोबर रोजी पांडे, मांगी, वडगाव उत्तर, पुनवर, जातेगाव, खडकी, आळजापूर, बिटरगाव श्री, कामोणे येथे कॉर्नर बैठका झाल्या. त्यानंतर सायंकाळी पोथरे येथे सभा झाली. या दौऱ्याला खूप मोठा प्रतिसाद मिळत आहे. ठिकठिकाणी वाजत गाजत स्वागत होत आहे.

पोथरे येथील सभेत आ.शिंदे म्हणाले, की आपण फक्त विकासकामांवरच निवडणूक रिंगणात उतरलो आहे. यापुढेही विकास कामे करायची आहेत. या सर्व गावांची मुख्य समस्या पाणी. सुदैवाने या पंचवार्षिक मध्ये कुकडी प्रकल्पाचे पाणी बंद पाईपद्वारे मांगी तलावात सोडण्यात यावे, यासाठी पाठपुरावा केला. त्याच्या सर्वेचे आदेश जलसंपदा मंत्री जयंत पाटील असतानाच प्राप्त झाले होते. कुकडी प्रकल्पावरती अवलंबून असलेला मांगी तलाव पूर्ण क्षमतेने भरला पाहिजे आणि लाभक्षेत्रातील गावांना त्याचा फायदा झाला पाहिजे या दृष्टीने प्रस्तावित कुकडी उजनी उपसासिंचन योजनेचे पाणी मांगी तलावात सोडणे आणि त्या माध्यमातून या भागाचा कायापालट करण्यासाठी मी प्रयत्नशील आहे. काम करत असताना मी माझा व विरोधातला असा कधीही भेदभाव केला नाही. आलेल्या प्रत्येकाचे काम करण्यावर माझा भर आहे; असेही आ.शिंदे यांनी सांगितले.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
**फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !**

सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर भरघोस डिस्काउंट

## उपवासाचे पदार्थ

**रेडिमेड स्नॅक्स**
- खजुर (लाल व काळी)
- सिडलेस खजुर (लाल व काळी)
- राजगिरा लाडू (गुळाचे व साखरेचे)
- गुळाची चिक्की (शेंगदाणा, राजगिरा वडी, कोकोनट, राजगिरा-शेंगदाणा मिक्स पिनट बटर, शेंगदाणा क्रश चिक्की)
- गुलकंद राजगिरा वडी व रोल
- नायलॉन शाबुदाणा (गोड व तिखट)
- केळी चिप्स् (तिखट व मीठाचे)
- बटाटा वेफर्स (तिखट व मीठाचे)
- बटाटा चिलीमिली
- बटाटा चिवडा (गोड व तिखट)
- राजगिरा लाही
- गावरान खारे शेंगदाणे
- भरूच खारे व नारळपानी शेंगदाणे
- तिखट शेंगदाणे
- लक्ष्मीनारायण बटाटा चिवडा (शेंगदाणा तेलातील)
- उपवास शाबुदाणा खाकरा
- उपवासाचे गोड लिंबू लोणचे
- शेंगतेल
- शेंगदाणे (घुंगरू व गावरान)
- शाबुदाणा (कॅमल, सिध्दी, लुज)
- इन्स्टंट बारीक शाबुदाणा (कॅमल, सिध्दी)
- पॅकींग सायकल भगर
- राजगिरा इ.

**काटदरे उपवास पीठ**
- राजगिरा पीठ
- उपवास भाजणी पीठ
- शिंगाडा पीठ
- सोमवार भाजणी पीठ (भगर विरहित)

**तळण्यासाठी कच्चे पदार्थ**
- कच्चा नायलॉन शाबुदाणा
- बटाटा पापड
- बटाटा - भगर पापड
- बटाटा व शाबुदाणा
- रंगीत पापडी
- शाबुदाणा पापडी
- बटाटा बॉबी, बटाटा वेफर्स
- बटाटा खिस
- बटाटा शेव, बटाटा स्क्रु
- शाबुदाणा बॉबी

*टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !

॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू

किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन अँन्ड स्वीटस् । बेकरी अँन्ड मिल्क प्रॉ नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अँन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

# वसुबारस निमित्त पांजरपोळ गोरक्षण संस्थेत गाईचे पूजन



करमाळा(सं.प्र.): वसुबारस म्हणजे दिवाळीचा पहिला दिवस. भारतीय संस्कृतीमध्ये दिपावली सणाला मोठे महत्व आहे. या दिवशी गाईची पुजा करतो; असे प्रतिपादन माजी नगरसेवक संजय सावंत यांनी केले. श्री पांजरपोळ गोरक्षण संस्था येथे वसुबारस कार्यक्रमानिमित्त गाईचे पूजन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक डॉ.श्रीराम परदेशी उपस्थित होते. पुढे बोलताना श्री.सावंत म्हणाले, की वसुबारसच्या रूपाने गाईचे संवर्धन करण्याचा मंत्र आपल्याला पूर्वजांनी दिला आहे. परंतु आज देशी गायीकडे दुर्लक्ष करीत आहोत. देशी गाईमध्ये अनेक गुण सामावलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक कुटूंबांनी शेतकऱ्यांनी एक तरी देशी गाय सांभाळावी. तसेच श्री पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे कार्य उल्लेखनीय आहे. त्यांच्या कार्यास आमचे सर्वतोपरी सहकार्य राहील; असे सांगितले. यावेळी श्री पांजरपोळ गोरक्षण संस्थेचे अध्यक्ष भरतकुमार गांधी, सचिव सुयश दोशी, राधेशाम देवी, अशोक दोशी, मुकूंद जव्हेरी, विजयकुमार दोशी, अमित दोशी, नरेंद्रसिंह ठाकूर, शिवनाथ घोलप, अब्रार पठाण, फारूक जमादार, महेश परदेशी, अर्चना गांधी, अमृता गांधी, प्राची दोशी वंदना मोरे , नानासाहेब मोरे उपस्थित होते.

# पृथ्वी सोशल फाउंडेशनच्यावतीने किल्ले, आकाश कंदील, रांगोळी स्पर्धा

करमाळा(सं.प्र.): पृथ्वी सोशल फाउंडेशनच्यावतीने करमाळा येथे दिवाळीनिमित्त विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये किल्ले बनवा स्पर्धा (वयोगट १० वी पर्यंत), आकाश कंदील स्पर्धा (वयोगट १ ली ते ५ वी व ६ वी ते १० वी), घरासमोरील रांगोळी स्पर्धा (वयोगट १३ ते १७ वर्षे पूर्ण व १८ वर्षे ते खुला गट ) घेण्यात येणार आहेत. सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कोणतीही नावनोंदणी करण्याची गरज नाही. किल्ले बनविण्यासाठी मातीचा वापर करायचा आहे. आकाश कंदिल बनविण्यासाठी प्लॅस्टिकचा वापर करायचा नाही. रांगोळी ही स्वत: सहभागी स्पर्धकाने काढायची आहे. प्रत्येक स्पर्धा गटातील दहा विजेत्यांना आकर्षक बक्षीसे, ट्रॉफी, प्रमाणपत्र दिले जाणार आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्यांनी त्यांचे व्हीडीओ किंवा फोटो व्हॉट्सअप नंबर ८६०५७८२९९६, ७०५७३५९६७१ या क्रमांकावर पूर्ण नांव, पत्ता व मोबाईल नंबर सह ११ नोव्हेंबरच्या आत पाठवावेत. या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभागी व्हावे; असे आवाहन आयोजक व पृथ्वी सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शिवनाथ घोलप यांनी केले आहे.

# करमाळा तालुका ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी सुनील अवसरे

करमाळा(सं.प्र.): राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीतून करमाळा तालुका ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी जेऊर येथील हरिओम मशिनरीचे मालक सुनील बाबुराव अवसरे (जेऊर) यांची निवड करण्यात आली. अकलुज येथे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी आमदार नारायण पाटील, जिल्हा कार्याध्यक्ष रविंद्र पाटील, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष अरूण तोडकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवारचे तालुका अध्यक्ष संतोष वारे आदी मान्यवरांच्या उपस्थित श्री.अवसरे यांची निवड करण्यात आली.

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर
रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरुस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रु. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२



02 NOV
टायगर ग्रुप
महाराष्ट्र अध्यक्ष
मा.श्री.डॉ. तानाजी
भाऊ जाधव
आपणांस उदंड आयुष्याच्या
अनंत शुभेच्छा...!
। ओंकार शिंदे
8390535227
शुभेच्छुक : टायगर ग्रुप महाराष्ट्र राज्य करमाळा शहर व तालुका

तालुक्याच्या राजकारणात रंगत

# जगतापांचा संजयमामा ऐवजी नारायण आबांना पाठींबा

करमाळा : करमाळा विधानसभा मतदार संघात रोज नव्यानव्या घडामोडी घडत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून महायुतीची उमेदवारी कोणाला मिळणार याबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. अखेर बागल गटाचे युवा नेते दिग्विजय बागल यांना थेट शिंदे शिवसेनेतून महायुतीची उमेदवारी जाहीर झाली आहे. याच प्रकारे माजी आमदार जयवंतराव जगताप हे निवडणूक लढवणार की पाठींबा देणार आणि पाठींबा दिला तर नेमका कोणाला देणार याबाबतचीही उत्सुकता शिगेला पोहोचली होती. अखेर राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत श्री.जगताप यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार नारायण आबा पाटील यांना जाहीर पाठींबा दिला आहे.

करमाळा तालुक्यामध्ये प्रत्येक विधानसभा निवडणुकीत वेगवेगळे चमत्कार घडतात आणि मतदारही त्यादृष्टीने निश्चितच निर्णायक मतदान करत असतात. माढा लोकसभा मतदारसंघातील मतदार असतानाही सन २०१४ मध्ये माजी आमदार नारायण आबा पाटील व रश्मी बागल यांची चुरशीची लढत झाली होती. त्यात ते विजयी झाले होते. सन २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीत नारायण आबा पाटील व विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांच्यात चुरशीची लढत झाली. त्यावेळी माजी आमदार जयवंतराव जगताप



यांनी आपले पाठबळ आमदार शिंदे यांना दिले होते. यावेळी नेमका बदल होत श्री.जगताप यांनी श्री.पाटील यांना आपले पाठबळ जाहीर केल्याने या निवडणुकीचे चित्र पालटत असल्याचे दिसून येत आहे. महाविकास आघाडीसाठी सध्याचे वातावरण अत्यंत चांगले आहे. याच महाविकास आघाडीची उमेदवारी पाटील यांना मिळाल्याने एक बाजू भक्कम झाली होती. श्री.जगताप यांच्या पाठींब्याने दुसरी बाजू भक्कम झाली आहे. श्री.जगताप यांना मानणारा या तालुक्यात मोठा वर्ग असून प्रत्येक गावात जगताप गटाचे अस्तित्व आहे. दोन गट एकत्र आल्याने सध्याच्या स्थितीला पाटील गटाच्या कार्यकर्त्यात मोठ्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मतदानच नव्हेतर जगताप यांच्या सभा ऐकण्यासाठी तालुक्यातील नागरीक उत्सुक असतात. त्याचा फायदाही श्री.पाटील यांना या निवडणुकीत मिळणार आहे.


## ।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।



सहवास जरी सुटला स्मृती सुगंध देत राहील ।
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर तुझी आठवण सतत येत राहील ।।

**कै.रमेश विश्वनाथ वीर**

यांचे निधन झाले. त्यांचे परिवाराच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत, ईश्वर त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो, हीच कमलाभवानी चरणी प्रार्थना !

शोकाकुल

• बनशंकरी किराणा स्टोअर्स • बनशंकरी मोबाईल शॉपी
• चिवटे परिवार राशिनपेठ, करमाळा.

संस्थापक/अध्यक्ष, श्रीराम प्रतिष्ठान





**श्री.सोमनाथ चिवटे**
अध्यक्ष- श्री जगदंबा कमलादेवी देवस्थान ट्रस्ट श्रीदेवीचामाळ
माजी उपनगराध्यक्ष, करमाळा नगरपरिषद

अध्यक्ष, टायगर ग्रुप म.राज्य



महाराष्ट्र राज्य टायगर ग्रुपचे अध्यक्ष
**मा.श्री.तानाजी(भाऊ) जाधव**
यांच्या दि.२ नोव्हेंबर रोजी असलेल्या वाढदिवसास व श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक/अध्यक्ष
**मा.श्री.गणेश चिवटे** यांना
**वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !**

शुभेच्छुक

**श्री.सोमनाथ भिमाशंकर चिवटे** (मा.उपनगराध्यक्ष),
**श्री.शिवराज सोमनाथ चिवटे** [मा.संचालक, अर्बन बँक], **श्री.बसवराज सोमनाथ चिवटे**

सौजन्य : बनशंकरी किराणा सेअर्स, बनशंकरी मोबाइर्लल शॉपी राशीनपेठ, करमाळा.

# उत्साही शिक्षकाचा अमृतमहोत्सवी वाढदिवस



"पाणी के बिना नदी बेकार है, अंगण के बिना घर बेकार है, अतिथियों के बिना अंगण बेकार है, पैसें के बिना पाकीट बेकार है और गुरू के बिना जिंदगी बेकार है।"

जीवनामध्ये शिक्षकाचे एक अलौकीक स्थान आहे.समाजातील वेगवेगळ्या घटकाला विसरले जाते, पण शिक्षकाला त्यांचा विद्यार्थी विसरू शकत नाही. शिक्षकाच्या कर्तृत्वाने देश संपन्न होतो. असे कर्तृत्वसंपन्न शिक्षक फार दुर्मिळ आहेत. अशा दुर्मिळ शिक्षका पैकी एक शिक्षक म्हणजे दत्तात्रय माधव चोपडे हे एक आहेत. विशेष म्हणजे गुरूजींनी पंचाहत्तरीत प्रवेश केला असलातरी आजही ते उत्साही व क्रियाशील आहेत.

चोपडे गुरूजी यांचे गाव वीट हे आहे. त्यांचे वडील शेतकरी होते. त्यांना मधुकर, शिवाजी व अनिल असे तीन बंधू आहेत. अत्यंत प्रेमळ व सरळमार्गी असलेल्या चोपडे परिवारातील पहिले शिक्षक म्हणजे दत्तात्रय चोपडे गुरूजी हे आहेत. शिक्षक झाल्यानंतर सुरूवातीला पुणे जिल्ह्यात मोकरवाडी येथे नोकरीला लागले होते. त्यानंतर सोलापूर जिल्ह्यात दुपडे वस्ती (माळशिरस) येथे १३ वर्षे शिक्षक म्हणून सेवा केली. तेथील काम हे उल्लेखनीय तर होतेच पण त्यांची करमाळ्याला बदली झाल्यानंतर स्थानिकांनी त्यांची बदली होवू नये म्हणून जोरदार प्रयत्न केले होते. एक चांगला शिक्षक जावू नये म्हणून ग्रामस्थ त्यांचेवर प्रेम करत होते. करमाळा शहरात बदली झाल्यानंतर त्यांनी तब्बल २२ वर्षे एक आदर्श शिक्षक म्हणून कार्य केले. त्यांच्या कार्यकाळात नगरपालिका मुलींची शाळा नं.१ या शाळेची उल्लेखनीय प्रगती झाली आहे. १५ खोल्यांची इमारत तर झालीच, पण विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढली होती. याबरोबरच त्यांनी जिल्हा शिक्षक सोसायटी व तालुका शिक्षक सोसायटी या दोन्ही सोसायटी मध्ये नेतृत्व केले. तब्बल २० वर्षे सचिव म्हणून त्यांनी काम केले. शिक्षक संघटन केलेच त्याबरोबरच ज्या शिक्षकांवर अन्याय झाला त्यांचेसाठी त्यांनी संघर्ष केला. सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांनी सेवानिवृत्तीच्या संघटनेत काम सुरू केले आहे. त्यांच्या पत्नी सौ.जयश्री चोपडे यांची साथ त्यांना मिळाल्याने त्यांना शिक्षण व सामाजिक क्षेत्रात झेप घेता आली. त्यांना दोन मुले व एक मुलगी आहे. त्यांची मुलगी सौ.स्वाती प्रमोद काळे यांना फिसरे येथे दिले असून प्रमोद काळे हे त्यांचे जावईही शिक्षक आहेत. नितीन चोपडे हे त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव असून तालुक्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांचे कार्य आहे. उत्कृष्ट सुत्रसंचलक व उत्तम वक्ता म्हणून त्यांची ख्याती आहे. नागेश चोपडे हे एम.फार्म झाले असून पुणे येथे कंपनीत नोकरीला आहेत.

अत्यंत समाधानी परिवार आहे. या परिवारात उत्साह व चैतन्य निर्माण करणारे चोपडे गुरूजींचा अमृत महोत्सवी वाढदिवस आहे. या वाढदिवसानिमित्ताने त्यांना खूप खूप शुभेच्छा..!

# मुकूंद साळुंके यांची राज्य कार्यकारिणी सदस्य पदी निवड



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र राज्य शिक्षक लोकशाही आघाडीचे पुणे विभागीय उपाध्यक्ष व जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेचे कार्याध्यक्ष मुकूंद साळुंके यांची राज्य कार्यकारिणी सदस्य पदी निवड करण्यात आली आहे.

सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेचे कार्याध्यक्ष लोकशाही आघाडीचे शिक्षक नेते मुकूंद साळुंके सर यांची बहुमताने निवड झाली आहे. महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीची पंचवार्षिक निवडणूक ८ ऑक्टोबर ते २७ ऑक्टोबर या कालावधीमध्ये लोकशाही पध्दतीने पार पडली. यामध्ये ६४ टक्के मतदान होऊन जी.के.थोरात यांच्या नेतृत्वाखाली लोकशाही आघाडीने प्रचंड बहुमताने विजय मिळवला आहे. यानंतर सर्व नवनिर्वाचित सदस्याची सभा होऊन जी.के.थोरात यांची अध्यक्ष पदी, नरसो पाटील यांची कार्याध्यक्ष पदी, के.एस.डोमसे यांची सचिव पदी तर प्रदेश सदस्य पदी मुकूंद साळुंके यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्याचा शाल, बुके देवून सन्मान करण्यात आला. नवनिर्वाचित अध्यक्ष थोरात यांनी येणाऱ्या काळामध्ये संघटना बळकट करण्यावर भर दिला जाणार असून प्रदेश सदस्य मुकूंद साळुंके यांचे काम चांगले असल्यामुळे शिक्षकांमध्ये त्यांच्या कार्याला पसंती दिली आहे. शिक्षकांचे प्रश्न प्राधान्ययाने सोडवले जातील ; असे आश्वासन दिले आहे.

यावेळी नवनिर्वाचित प्रदेश सदस्य मुकूंद साळुंके यांनी महाराष्ट्र लोकशाही आघाडी टीडीएफ च्या माध्यमातून करमाळा तालुक्यातील व सोलापूर जिल्ह्यासह प्रदेश स्तरावरील शिक्षकांचे सर्व प्रश्न सोडविण्यासाठी आपण काम करणार असल्याचे सांगितले. मुकूंद साळुंके सर यांनी शिक्षकांचे प्रश्न, अडीअडचणी मार्गी लावून त्यांचा विश्वास संपादन करून शिक्षकांमध्ये आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. त्यांनी केलेल्या कामाची पोचपावती म्हणून त्यांची महाराष्ट्र प्रदेश सदस्य पदी निवड झाली आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

गावरान गायीचे
गोमुत्र मिळेल..!



संपर्क : विठ्ठल गोसावी, देवळाली. (९०९६९६४७८१)

Shweta
Gift & Toys
दिवाळी धमाका





श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा. (9822058106 / 9096416076)







आतार डेव्हलपर्स
फंडगल्ली, करमाळा., जि.सोलापूर
बुकींगसाठी संपर्क
जावेद आतार (9423334210)
मुन्नाभाई काझी (9881089582)


ओंकार
ज्वेलर्स अँण्ड गोल्ड पॅलेस
दिवाळी धमाका ऑफर
सोन्यासारख्या ग्राहकांना सोन्याच्या खरेदीवर ऑफर....
सण दिवाळीच्या उत्सव दागिन्यांचा...!
शुभदीपावली
दागिन्यांवर 100% एक्सचेंज ऑफर
जुने २२ कॅरेट दागिने घेऊन या व त्याच वजनाचे दागिने घेऊन जा.
- ऑफर कालावधी -
२० ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर पर्यंत
शाखा नं : १) गुजर गल्ली, करमाळा.
शाखा नं : २) मेन रोड, भंडारे हॉस्पिटल शेजारी, करमाळा
83790 27471 | 9921316955


इंदापूर तालुक्यातील सर्वात भव्य शोरूम
गांधी सराफ & कंपनी
बारामतीकर
खास दीपावली निमित्त
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
15% डिस्काऊंट
ऑफर : दि. 20 नोव्हेंबर 2024 पर्यंत
*नियम व अटी लागू
"सगळा आनंद सगळे सौख्य,सगळ्या स्वप्नांची पूर्णता,
यशाची सगळी शिखरे,सगळे ऐश्वर्य,
हे आपल्याला मिळू दे, ही दीपावली आपल्या आयुष्याला
एक नवा उजाळा देवू दे..."
शुभ दिपावली
मेन रोड, इंदापूर, जि. पुणे | मो. नं. 9404239600/9860813001

देवी परिवारा तर्फे सर्वांना

# दिपावली व नूतन वर्षाच्या

## हार्दिक शुभेच्छा



# देवी

## प्लायवुड & हार्डवेअर

• प्लायवुड • हार्डवेअर •
• सनमायका • कचन ट्रॉली •
• फेव्हिकॉल • वॉल पेपर •
• वुडन प्लोरिंग •



घरगुती वापरा साठी आल्युमिनियमची शिडी मिळेल. सर्व साईज मध्ये उपलब्ध.

करमाळा शहरातील एकमेव लॅमिनेट आणि हार्डवेअर चे भव्य शोरुम



# विघ्नहर्ता

## इंटिरीयर

प्रोप्रा.अभिनव कमलेश देवी
Mo. 9011524252

प्रोप्रा.अभिषेक कमलेश देवी
Mo. 9028075051

**पत्ता : मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर.**


असंख्य ग्राहकांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !
खास दिवाळीनिमित्त घडणावळीवर...
गोल्ड ज्वेलरी 15% सुट
टेंम्पल ज्वेलरी 20% सुट
डायमंड ज्वेलरी 50% सुट
AJ Anandi Jewellers
आनंदी ज्वेलर्स
*नियम व अटी लागू.
मेनरोड, करमाळा. फोन(०२१८२)२२२२०९, मो.९४२०९१५०९९


2BHK रो बंगलो
लोनची सुविधा
वैशिष्ट्ये
● बांधकाम – सर्व बांधकाम आरसीसी, कुंभारी वीट व ५३ ग्रेड सिमेंट
● खिडक्या – ग्रेनाईट विंडोसील सह, तीन ट्रॅक, ॲल्युमिनियम, कोटेड, स्लायडींग ● फोरव्हिलर पार्कींग
● जीना – आर.सी.सी. ● स्वतंत्र बोअर ● आकर्षक प्रवेशद्वार ● १००० लिटरची पाण्याची टाकी
● लाईट फिटींग – कन्सील्ड फिटींग, फॅन, बल्ब, ट्युबसह ● वॉटर हिटरसाठी सोलर सिस्टीम
● किचनमध्ये अल्ट्रा ॲक्वा प्युरीफायर ● हॉल, किचन व बेड संपूर्ण पी.ओ.पी. एल.ई.डी. फोक्ससह
● प्रत्येकाला स्वतंत्र कंपाऊंड वॉल, पार्कींग स्टाईलसह ● मुख्य दरवाजा लोखंडी सेफ्टी गेटसह
2BHK रो बंगलो
मोजकेच शिल्लक !
आजच संपर्क साधा..!
Happy Diwali
दिपावलीनिमित्त खास ऑफर
साईट पत्ता :-मथुरानगर, एस.टी.कॉलनी शेजारी, करमाळा., जि.सोलापूर. संपर्क : मो.9921309309, 9860147425